**नियमित दिवाणी मुकदमा नं.११/२०१७ मधील**

**निशाणी ९२ व ९६ खालील आदेश**

(रिटा पिंटो व.८ वि. जुलियान डिसोजा व.१९)

**CNR NO.MHSIO4-000043-2017**

प्रस्तुतचे अर्ज म्हणजचे निशाणी ९२ कडे फुलामेन अंतोन पिंटो व व्हिक्टर अंतोन पिंटो यांनी तर निशाणी ९६ कडे बाजील जूवॉव पिंटो या त्रयस्थ अर्जदारांनी दाखल केलेले असून, त्यांना प्रस्तुत कामी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे पक्षकार म्हणून सामील करणेची त्यांनी विनंती केलेली आहे. वरील दोन्ही अर्जांवर वादी यांनी एकत्रितरित्या आपले म्हणणे निशाणी ९९ कडे दाखल केलेले आहे. वर नमुद दोन्ही अर्ज हे एकमेकांशी निगडीत असल्याने ते एकत्रित विचारात घेण्यात आलेले आहेत.

२. निशाणी ९२ कडील अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, या दाव्यामध्ये नमुद मिळकतींपैकी गांव मौजे कडावल येथील सर्व्हे नं.१३२'अ' ही मिळकत या दाव्यातील मिळकतींपैकी एक आहे. वादी यांचा मुलगा श्री.कैतान पिंटो याने या मिळकती संदर्भात याच मे. न्यायालयामध्ये रे.दि.मु.नं.९९/२०१७ चा दावा दाखल केलेला होता. सदरच्या दाव्यामध्ये त्रयस्थ पक्षकार यांना प्रतिवादी करुन दावा मिळकतीमध्ये त्यांची घरे असून, उर्वरीत मिळकतींच्या संदर्भात ताकीद कब्जाची मागणी केली होती. परंतु, सदरचा दावा चौकशीला असताना काढून घेतला. या दाव्याचे कामी त्रयस्थ पक्षकार यांनी कैफियत देऊन या मिळकतीमध्ये त्यांचे घर असून, त्रयस्थ पक्षकार यांच्या उठवणीची फळझाडे व फुलझाडे असल्याचे, तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रामध्ये लागवड केल्याचे नमुद केलेले आहे. वर नमुद ६५ गुंठे क्षेत्र हे त्रयस्थ पक्षकार यांच्याच कब्जामध्ये आहे, याची वादीसह अन्य सर्व प्रतिवादी यांना माहिती आहे. सदरची वहिवाट ही सन १९९५ पुर्वीची असून, आजपर्यंत त्या

वहिवाटीस आडकाठी झालेली नाही. सदरील दावा मिळकतीचे त्रयस्थ पक्षकारांना कोणतीही माहिती न देता वाटप करुन घेवून त्याचा प्रत्यक्ष ताबा घेण्याचा वादी यांचा प्रयत्न दिसत आहे. असे झाल्यास त्रयस्थ पक्षकार यांना त्यांचे घरास तसेच कायदेशीर कब्जास मुकावे लागणार आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करण्याची मागणी केलेली आहे.

३. तसेच निशाणी ९६ कडील अर्जाप्रमाणे वादी यांनी सदर दाव्यामध्ये त्यांचे हिश्श्याची मागणी केलेली आहे. सदर दाव्यातील नमुद मिळकतींपैकी सर्व्हे नं.१३२ 'अ' या मिळकती संदर्भात वादी यांचा मुलगा कैतान पावलू डिसोजा याने याच मे. न्यायालयामध्ये रे.दि.मु.नं.९९/२०१७ चा दावा फूलामेन अंतोन पिंटो वगैरे ५ यांच्याविरुध्द दाखल केला होता. सदरच्या दाव्यामध्ये अर्जदार हे प्रतिवादी क्र.२ होते. सदर दाव्यामध्ये त्यांनी त्यांचे कैफियतीमध्ये ०–१९–०५ या क्षेत्रामध्ये त्यांची वहिवाट असल्याचे कथन केलेले होते व सदर मिळकतीमध्ये त्यांचे राहते घर असल्याचे नमुद केले होते. तसेच वादी यांच्या मुलाने मिळकतीमध्ये त्रयस्थ अर्जदार यांची घरे असल्याचे मान्य केले होते. असे असतानासुध्दा वादीने त्रयस्थ अर्जदार यांना कोणत्याही प्रकारे या दाव्याच्या कामी पक्षकार न करता दावा मिळकतीचे वाटप करुन घेऊन त्रयस्थ अर्जदार यांचा दावा मिळकतीमध्ये निर्माण झालेला हक्क डावलू पहात आहेत. दावा मिळकतीमधील सर्व्हे नं.१३२ 'अ' या मिळकतीत त्रयस्थ अर्जदार याची सुमारे ०–१९–०५ गुंठे क्षेत्रात वहिवाट असून त्यामध्ये त्याचे राहते घर आहे. तसेच त्याने लागवड केलेली आंबा, काजू, नारळ व अन्य फळझाडे आहेत, याची पुर्ण जाणीव वादी हिचे कुटुंबाला होती. या संदर्भातील सर्व कागदपत्रे त्रयस्थ अर्जदार यांनी याकामी हजर

केलेली आहेत. त्यामुळे वर नमुद क्षेत्रामध्ये त्रयस्थ पक्षकार यांचा हक्क निर्माण झालेला आहे. त्यामुळे सदर हक्क शाबीत करुन ताबा मिळणेसाठी या दाव्याचे कामी अर्जदार यांना त्रयस्थ पक्षकार करुन घेऊन त्यांना आपली बाजू मांडणे गरजेचे असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. सदर दोन्ही अर्जास वादी यांनी निशाणी ९९ कडे त्यांचे एकत्रित म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या कथनानुसार सदर दोन्ही अर्जातील मजकुर धादांत खोटा व खोडसाळ आहे. सदरचे अर्ज पाश्चात्य बुध्दीने दाखल केलेले आहेत. वादींनी दावा धडेवाटप होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे व त्यामध्ये त्यांचे हिस्से नमुद आहेत. त्रयस्थ अर्जदार यांची मागणी चुकीची व निराधार आहे. दावा मिळकतीमध्ये नेमका त्यांचा काय हक्क आहे, याबाबत त्यांनी कोठेही नमुद केलेले नाही. रे.दि.मु.नं.९९/२०१७ या दाव्यामध्ये सर्व वादी व प्रतिवादी पक्षकार नव्हते. सर्व्हे नं.१३२, हिस्सा नं. 'अ' यामध्ये त्यांची घरे असतील, तर त्यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क आहे, असे होत नाही. तसेच अभिलेखात कोठेही त्यांची नावे नमुद नाहीत. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास त्रयस्थ अर्जदार हे आवश्यक पक्षकार नाहीत. सर्व्हे नं.१३२, हिस्सा नं. 'अ' या मिळकतीतील तथाकथीत घरांचा व वहिवाटींचा उल्लेख केलेला नाही. तसेच त्याच्या पुष्ठ्यर्थ कोणताही पुरावा हजर केलेला नाही. सदरचे अर्ज सद्भावनेचे नसुन दाव्याच्या सुनावणीस विलंब होणेकरीता दाखल केलेले आहेत. सबब, सदरचे दोन्ही अर्ज नामंजुर करणेची त्यांनी विनंती केलेली आहे.

५. प्रतिवादी यांनी सदर दोन्ही अर्जावर आपले म्हणणे दाखल केलेले असून कागदपत्रांचा विचार करता योग्य तो आदेश करणेबाबत विनंती केलेली आहे.

६. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

७. त्रयस्थ अर्जदारतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एल.पी.मार्गी यांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एम.डी.कुंटे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.बी.लोट यांचा युक्तीवाद ऐकला.

८. प्रस्तुतचा दावा हा वादींनी दावा मिळकतीचे सरस–निरस धडेवाटप होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्रयस्थ अर्जदार यांचे कथनाप्रमाणे वादीचा मुलगा कैतान पिंटो याने या मिळकती संदर्भात न्यायालयामध्ये रे.दि.मु.नं.९९/२०१७ चा दावा दाखल केलेला होता व सदर दाव्यामध्ये प्रस्तुत त्रयस्थ पक्षकार यांना प्रतिवादी करुन दावा मिळकतीत त्यांची घरे असून उर्वरीत मिळकतींच्या संदर्भात ताकीद व कब्जाची मागणी केलेली होती. परंतु, सदरचा दावा चौकशीला असताना त्यांनी काढून घेतला. सदर दाव्यामध्ये प्रस्तुत त्रयस्थ पक्षकार यांनी आपली कैफियत दाखल केलेली असून सुमारे ६५ गुंठे क्षेत्रामध्ये त्यांची कब्जेवहिवाट असल्याचे नमुद केलेले होते.

९. सदर कथनांच्या पुष्ठ्यर्थ त्रयस्थ अर्जदार यांनी रे.दि.मु.नं.९९/२०१७ या दाव्यातील निशाणी १ ची सही शिक्क्यांची प्रत हजर केलेली आहे. सदरचा दावा हा प्रतिवादी यांनी बांधलेली घरे वगळून उर्वरीत मिळकतींमध्ये हरकत करु नये याबाबत प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई ताकीदीची मागणी केल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा निशाणी ४० कडील अर्जान्वये मागे घेण्यात येऊन प्रतिवादी यांना रक्कम रुपये २५००/– इतकी खर्चाची रक्कम देण्याबाबत आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. सदर दाव्यातील प्रतिवादींची नावे पाहता फुलेमान अंतोन पिंटो, बाजील जुवॉव पिंटो, फतिमा जोसेफ देसा, रॉकी ऑगस्तीन डिसोजा,

व्हिक्टर आंतोन पिंटो इत्यादी असल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादींपैकी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे त्यापैकी असल्याचे दिसून येते. वादीने आपल्या म्हणण्यामध्ये दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ अर्जदार यांची घरे असल्याबाबत मान्य व कबूल केले आहे. परंतु, केवळ त्यांचा कोणताही हक्क नसल्याचे कथन केलेले आहे. निश्चितच प्रस्तुतचा दवा वाटपाकरीता असल्याने व दावा मिळकतीत तिऱ्हाईत अर्जदार यांची घरे असल्याने प्रस्तुत दाव्यातील हुकुमनाम्याने त्रयस्थ अर्जदार यांच्या दावा मिळकतीमध्ये असणाऱ्या घरासंदर्भात परिणाम होताना दिसून येतो. सदर तिऱ्हाईत इसमांचे हक्क व अधिकार कोणत्या अनुषंगाने आहेत, ही बाब दाव्याच्या गुणदोषावर ठरणारी आहे. सध्यस्थितीमध्ये तिऱ्हाईत इसमांचा दावा मिळकतीत कोणताही संबंध नाही, असे म्हणता येणार नाही. दावा मिळकतीतील अस्तित्वात असणाऱ्या घराबाबत वादीने आपल्या दाव्यामध्ये कोठेही नमुद केलेले नाही. सदरची बाब वादी यांनी दाव्यामध्ये लपवल्याचे दिसून येते. याचाच अर्थ सदर दाव्यातील हुकुमनाम्याने तिऱ्हाईत इसम यांच्या दावा मिळकतीत असणाऱ्या घरांच्या अस्तित्वाबाबत बाधा निर्माण होताना दिसते.

**१०.** सदर तिऱ्हाईत इसम यांची सदर घरांमध्ये असणारी कब्जेवहिवाट कोणत्या अधिकाराने आहे, हे ठरवण्याकरिता निश्चित प्रस्तुतचे तिऱ्हाईत अर्जदर हे दाव्याचे आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येते. वादी यांनी सदर तिऱ्हाईत इसमांचा पुर्ण हक्क डावल्याने सदर तिऱ्हाईत इसमाना त्यांचे अधिकार शाबीत करण्याची संधी दिलेस न्यायोचित होणार आहे.

**११.** सध्यस्थितीमध्ये दावा चौकशीकरीता प्रलंबित आहे. सदर तिऱ्हाईत इसमांचे अधिकार प्रस्तुत दाव्यामध्ये गुंतल्याचे दिसून येते. सदर तिऱ्हाईत इसम यांना पक्षकार म्हणून सामील केलेस प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निर्णीत होणेस मदत होणार आहे. वादी यांना सदर

तिऱ्हाईत इसमांचा पुरावा नाकारण्याची, तसेच त्यांचेतर्फे साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्द असल्याने, त्यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. त्रयस्थ अर्जदार यांचे निशाणी ९२ व ९६ कडील अर्ज मंजूर करण्यात येतात.
२. वादी यांनी तिऱ्हाईत अर्जदार निशाणी ९२ व ९६ कडील यांना प्रस्तुतकामी प्रतिवादी सदरामध्ये सामील करणेचे आहे. त्याबाबतची दुरुस्ती वादीने पुढील तारखेस किंवा त्याआधी करणेची असून त्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेचे आहे.
३. वादी यांनी दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती केल्यानंतर, नव्याने सामील केलेल्या पक्षकारांना दाव्याचे समन्स पाठविणेत यावेत.

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.12.15 18:05:01 +0530

(आर.जी.कुंभार)
अति. सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)
कुडाळ.

दिनांक – १२/१२/२०२५.